(९९) २९३२५/३०

मान्यता
कायम विनाअनुदान (इंग्रजी माध्यम)

जा.क्र.शिऊसं/प्राशि-३/नप्राप्राशा/पुवि-०९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 2 DEC 2009

प्रति,

शिक्षणाधिकारी, (प्राथमिक)
जिल्हा परिषद , पुणे.

विषय : २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत . .

संदर्भ : १.शासन पत्र क्रमांक नप्राशा-१००८/प्र.क्र.६७९/प्राशि३दि.२०.८.२००९
२.मा.प्र.शिक्षण सहसंचालक (प्राथ.),प्राथमिक शिक्षण संचालनालय,म.रा.पुणे, यांचे पत्र क्र.नप्राशा/२००८-०९/इंग्रजी/मान्यता/ड ५१२(ब)/३७२८ दि.८/१०/२००९.

उपरोक्त विषयाचे संदर्भान्वये आपणांस कळविण्यांत येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००९ - २००१० या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | चौधरी अत्तरसिंह यादव मेमोरीयल एज्यु ट्रस्ट, प्राइड प्लाझा, डॉ.आंबेडकर पुतळाच्या मागे, पिंपरी, पुणे-१८ | सिध्दांत पब्लिक स्कूल, सुदंबरे, मावळ, पुणे | पहिली | इंग्रजी |

## कायम विनाअनुदानीत

त्यामूळे या संस्थेकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमून्यातील स्वयंस्पष्ट शिफारशींसह आपला अहवाल १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यांत येत आहे..

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना शाळा परवानगी देणे/ न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करण्यांत येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी..
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक / माध्यमिक शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमून्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिका-यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विदयार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच आपला अभिप्राय सादर करावा.व त्याआधारेच शाळेची परवानगी दिली जाईल.
११. सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकडया संबंधित संस्था उघडणार नाही. असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यांत आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा काढणार नाही. याबाबत देखिल संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३ शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ मधील तरतूदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेली सदर शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगीचे आदेश रद्द झाले आहेत.असे गृहीत धरले जाईल.सदर शाळा १८ महिन्याच्या आत संस्था सुरु करणार असल्यास तसा संस्थेचा ठराव सादर करण्यात यावा. सदर शाळा २००९-१० मध्ये सुरु केलेली नसल्यास व भविष्यात शाळा सुरु करावयाची नसल्यास त्याबाबत संस्थेचे लेखी पत्र आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

Recd AD
Inward & do the needful
EO
11/12/09

Scanned with OKEN Scanner

१४ संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित [illegible] संस्था कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरूपी जतन करून ठेवाव्यात.

१५ संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा - नाव, जात, अल्पसंख्यांक, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

१६ अर्जदाराचे पी.क्र.४८३/०४ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.
२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.
३. शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India ) अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.
५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर, २००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

स्थळप्रतीवर मा. शि. उ. स.
यांची सही असे.

(कु-हाडे सु. जं.)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१.करिता

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

प्रत : १.मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.
२.मा. शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी

प्रत : अध्यक्ष/सचिव
चौधरी अत्तरसिंह यादव मेमोरीयल एज्यु ट्रस्ट, प्राइड प्लाझा, डॉ.आंबेडकर पुतळाच्या मागे, पिंपरी, पुणे-१८

राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१७-१८ या वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाव-२०१८/प्र.क्र.२७भाग-१/एसएम-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीखः १८ मे, २०१८

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.प्राशातु-१११२/(२५८/२०१३)/प्राशि-३ दिनांक २/७/२०१३,
२. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. खाप्राशा-२०१७/६५८९/ प्रशा-ड/५१२/-अ-१/३९६५,दि. ७/९/२०१७,
३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/वर्गवाढ /ड-५१२-अ-१/१०९३, दिनांक १२/३/२०१८,
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/वर्गवाढ /४२१७/ ड ५१२-अ-१/१५५२, दिनांक २८/३/२०१८,

निर्णयः-

खाजगी प्राथमिक शाळांना खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| शाळेचे नांव | माध्यम | मागणी केलेला वर्ग | वर्ष |
|---|---|---|---|
| एस.एस. निकम इंग्लिश मिडीयम स्कुल, दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड | इंग्रजी | इयत्ता ५ वी | २०१७-१८ |
| सिध्दांत इंटरनॅशनल CBSE स्कुल, सुदुंबरे, ता. मावळ जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |
| संत साई कॉन्व्हेंट, पब्लिक स्कुल, सर्वश्री नगर, दिगोरी, नागपूर | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |
| समर्थ कॉन्व्हेंट, रामटेक, जि. नागपूर | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |

वरील शाळांना सन २०१७-१८ या वर्षापासून इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदीनुसार

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

२. शाळेस वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील,

३. सदर वर्गात विहीत नियमांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अ.पां.बोरवणकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
३. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई, पुणे, नागपूर,
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, रायगड, पुणे, नागपूर,
७. निवडनस्ती एसएम-५.

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१७-१८ या वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाव-२०१८/प्र.क्र.२७भाग-१/एसएम-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीखः १८ मे, २०१८

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.प्राशातु-१११२/(२५८/२०१३)/प्राशि-३ दिनांक २/७/२०१३,
२. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. खाप्राशा-२०१७/६५८९/ प्रशा-ड/५१२/-अ-१/३९६५,दि. ७/९/२०१७,
३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/वर्गवाढ /ड-५१२-अ-१/१०९३, दिनांक १२/३/२०१८,
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/वर्गवाढ /४२१७/ ड ५१२-अ-१/१५५२, दिनांक २८/३/२०१८,

निर्णय:-

...गी प्राथमिक शाळांना खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग ...र्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| शाळेचे नांव | माध्यम | मागणी केलेला वर्ग | वर्ष |
|---|---|---|---|
| एस.एस. निकम इंग्लिश मिडीयम स्कुल, दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड | इंग्रजी | इयत्ता ५ वी | २०१७-१८ |
| सिध्दात इंटरनॅशनल CBSE स्कुल, सुदुंबरे, ता. मावळ जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |
| संत साई कॉन्व्हेंट, पब्लिक स्कुल, सर्वश्री नगर, दिगोरी, नागपूर | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |
| समर्थ कॉन्व्हेंट, रामटेक, जि. नागपूर | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |

वरील शाळांना सन २०१७-१८ या वर्षापासून इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग स्वयंअर्थसहाय्यित ...वर जोडण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदीनूसार

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,
१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
वेब साईट- www.dydepune.com

जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/पुवि/२०१८-१९/ ४३४०

दिनांक- 11 JUN 2018

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अहमदनगर/पुणे/सोलापूर

विषय— राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देणेबाबत

संदर्भ- १. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) म.रा. पुणे यांचे पत्र जा.क्र. खाप्राशा-२०१८/कांबाद/ ड ५१२-आ-१/२४०० दि २३.०५.२०१८
२. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. ०२/एसएम-५, दि. १७.०१.२०१८
३. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. ९/एसएम-५, दि. १५.०२.२०१८
४. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. १०/एसएम-५, दि. २६.०२.२०१८
५. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. १३/एसएम-५, दि. १५.०२.२०१८
६. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. १९/एसएम-५, दि. १२.०३.२०१८
७. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. २४/एसएम-५, दि. १९.०४.२०१८
८. शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१८/प्र.क्र. २७ भाग-१/एसएम-५, दि. १८.०५.२०१८

अहमदनगर/पुणे/सोलापूर जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटींच्या व शर्तीच्या अधिन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे.

| शासन यादी क्र. | शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | वर्ग | मंजूर वर्ष |
|---|---|---|---|---|
| १२ | इंदिरा मेमोरियल इंग्लिश स्कुल, मिरजगांव, ता. कर्जत, जि. अहमदनगर | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| १ | सद्गुरु धुळेश्वर महाराज विद्यालय, मंद्रुप, ता. द. सोलापूर | मराठी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| १ | दि जिनियस इंग्लिश मिडीयम हायस्कूल हिंजवडी, ता. मुळशी जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| २ | श्री नागेश्वर न्यु इंग्लिश स्कुल मोशी, ता. हवेली, जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ३ | ग्रिनवुड स्कुल हडपसर, पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| २ | युनिव्हर्सल स्कुल पेरणे, ता. हवेली, जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| १ | न्यू विलास धानका इंग्लिश मिडीयम स्कुल [illegible], ता. राहुरी, जि. अहमदनगर | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| १ | सेंट मेरीज गर्ल्स स्कुल, डेक्कन कॉलेज रोड, येरवडा, पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ३ | वंडरलँड इंग्लिश मिडीयम स्कुल, हडपसर, पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| २ | सिध्दांत इंटरनॅशनल स्कूल, कुडे, ता. मावळ, जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |

अटी व शर्ती :-

१. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार भौतिक सोयी सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.
२. शाळेला वर्ग खोली उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
३. सदर वर्गास विहीत निकषाप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर/पुणे/सोलापूर यांनी करावी.

उपरोक्त अटी व शर्तीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास, संचालनालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे १.

प्रत :

E:\PR-2\Swayarthsahait\Order.docx

68

Scanned by CamScanner

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

**No.NOC-4018/C.R.No.137/SM-3**
School Education and Sports Deptt.
Madam Cama Road,Hutatma Rajguru
Chowk, Mantralaya,
Mumbai- 400 032.
Date:-27th June, 2018

**To,**
**The Secretary,**
Central Board of Secondary Education,
Siksha Kendra 2, Community Centre,
Preet Vihar, Vikas Marg,
**New Delhi 110301.**

**Sub:-** Renewal of No Objection Certificate for affiliation of **Central Board of Secondary Education**
**"Siddhant International School, Post-Sudumbare, Tal. Maval, Dist.Pune" run by "Chaudhari Atarsingh Yadav Memorial Education Trust, Pride Plaza, 1st Floor, Behind Dr.Ambedkar Statue, Pimpri, Pune-18"**

**Ref:-** 1) Government Resolution, School Education & Sports Department, No. NOC. 2009/ (663/09)/SE-1, Dated 20/6/2012.
2) Government Letter, School Education and Sports Department, No.NOC-2009/C.R.No.32/09/SE-1, Dated-07/02/2009.
3) Letter Dated -08/02/2018 from Sanjay Vishwanath Hegade, MLA, Maval, Pune.

Sir,

I am directed to forward herewith the application along with enclosures in original received for **"Siddhant International School, Post-Sudumbare, Tal. Maval, Dist.Pune"** run by **"Chaudhari Atarsingh Yadav Memorial Education Trust, Pride Plaza, 1st Floor. Behind Dr.Ambedkar Statue, Pimpri, Pune-18"** and to state that the State Government has No Objection for Renewal of C.B.S.E. affiliation to the school for **Std.I to Std.XII** subject to fulfillment of different conditions laid down in the Government Resolution, School Education and Sports Department, No. NOC. 2009/(663/09)/SE-1, dated 20/6/2012 as well as following conditions:-

1. Like all other schools in the State, Section 18 & 19 of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and its Schedule as well as Rules, Orders, Notifications and Circulars etc. issued by the State Government from time to time under this Act shall be applicable to the said school.
2. Institution shall abide by the provision of Section 12(1)(C) of RTE Act, 2009 and Maharashtra RTE Rules 2011.
3. RTE Act, 2009 provides for Inclusive Education thus children with special needs (CWSN) called " Divyang " shall be part of every class in the school. However, " Divyang" children need special policy pronouncements. The State of Maharashtra is framing and issuing various policies in this respect. Goverment recently issued Resolution No. Misc 2015 / (119-A)/ SD-6 Dated 8th January,2016 in this reguard, this Government Resolution is abiding. All directives, decisions and policies shall be abided by all schools of all boards including international boards.
4. State's all Educational Acts, Rules, Orders and Policies made time to time shall be applicable to the said school.

CAYM Education Trust's Siddhant International School, Sudumbare, Pune-412 109.

Scanned with OKEN Scanner

5. Curriculum of the State Board or respective Board shall be compulsory for I to VIII Standard.
6. Marathi language subject shall be taught from I to VIII standard.
7. Staff salaries shall not be paid lesser than the Schedule 'C' of Maharashtra Employees of Private Schools (Conditions of Service) Regulation Act, 1981.
8. The management shall follow the traffic and safety guidelines indicated by the Police, Fire Services and Transport Department from time to time. The instructions issued by Circular No. 21748/DI/97 dated 16/2/1998 and No. PRE-2008/506/11/Prashi-1 dated 14/7/2011 & other orders of transport department for safe transportation of school children should be scrupulously followed. The management shall provide fire protection arrangement as prescribed in the National Building Code of India, Part-IV Fire 1997 and there are amendments made from time to time.
9. The school shall conduct 3 tests annually for all children upto Standard VIII and provide information about children achievements in SARAL database as per the provisions of Pragat shaikshanik Maharashtra Government Resolution dated 22nd june 2015.
10. Childwise information as sought in SARAL and every other information as sought in U-DISE shall be provided by the school from time to time as demanded by the State Authorities.
11. Institution shall abide by the policy and Maharashtra Educational Institutions (Regulation of Fees) Act, 2011 made by the State Government regarding Regulation of fees.
12. Indian History especially "History related to Maharashtra" shall be taught in the school. Failing which this No Objection Certificate shall be withdrawn.
13. The Complaint Redressal Committee regarding sexual harassment at school premises should be formed as per government resolution, woman and child department No. मकचौ-२०१३/ प्र.क्र.६३ /मकक, Dated 19.6.2014 and subsequent provisions in Act and Rules
14. The State Government reserves the rights to withdraw the above certificate at any time without giving prior notice and without assigning any reason if any deviation of rules reported in future and the management falls to comply with the instructions of the State Government.

2. You are requested to forward a copy of the affiliation when granted to the above school for office record.

3. This No Objection Certificate is valid till next three years from the date of issue.

Yours faithfully,

S.M. Nanal

( S.M.Nanal )

**Deputy Secretary to the Government of Maharashtra.**

**Copy to -**

1) The Principal Secretary, School Education & Sports Department, Mantralaya, Mumbai.
2) The Commissioner ( Education ), Maharashtra State, Pune.
3) The Director (Primary/Secondary & Higher Secondary) Maharashtra State, Pune.
4) The Deputy Director of Education, Pune Division, Pune.
5) Education Officer (Primary / Secondary & Higher Secondary), Z.P., Pune.
6) Private Secretary to the Hon'ble Minister (School Education)
7) The Principal, "Siddhant International School, Post-Sudumbare, Tal. Maval, Dist.Pune"
8) Select File (SM - 3)

Scanned with OKEN Scanner

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/1151/2019
पुणे 1 दिनांक :- 3/9/2019

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
सी.ए.वाय.एम ई ट्रस्ट संचलित सिध्दांत इंटरनॅशनल स्कूल, सुंदुबरे, मावळ, जि.पुणे

**विषय:-** सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत

**संदर्भ** :- 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1, 6 व 24) 2013
2.शासन निर्णय क्रमांक-प्राशाव-2018/प्र.क्र.27/भा-1/एसएम-1 दि.18.5.2018
3. शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे यांचे पत्र जा.क्र.शिउंस/प्राथ-202/स्वंअशाळा/मान्यता/पुवि/2018-19/4340 दिनांक-11.6.2018

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तीवर विद्यमान प्राथमिक शाळेस प्राथ ते उच्चप्राथमिक इ.8 वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे .**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नोव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 9 |
| 1 | सी.ए.वाय.एम ई ट्रस्ट | सिध्दांत इंटरनॅशनल स्कूल, सुंदुबरे, मावळ, जि.पुणे | इंग्रजी | नविन शाळा | इ.8 वी | 2016-17 |

## अटी व शर्ती

1.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
2.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
3.या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
4.संदर्भ क्रमांक 02 अन्वयेसन 2016-17 मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6 शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
7..महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन निर्णय क्र. प्राशाव-2018/प्र.क्र.27/भा-1/एसएम-1 दि.18.5.2018 तील अटी शर्तीतील मददा क्र.2 चे पूर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9 महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

3/9/19
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**
1)मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2)मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1
3)मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1.

Scanned with OKEN Scanner